# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 09.09.2025** **वार- मंगळवार**

---

**अजितपवार**

पुणे, पिंपरी चिंचवडसह राज्यातील सर्व स्थानिक नियोजन प्राधिकरणांनी सुसज्ज रस्ते, सोयी - सुविधा असणारे म्हाडाचे लेआउट मंजूर करून त्यानुसार एकल किंवा समूह पुनर्विकास करावा, असे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत; पुणे गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास मंडळाच्या विविध विषयांबाबत बैठक आयोजित करण्यात आली होती. पुणे म्हाडाच्या रखडलेल्या पुनर्विकास प्रकल्पांच्या कामाचाही त्यांनी सविस्तर आढावा घेतला. प्रधानमंत्री आवास योजना ही पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी योजना आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. परवडणाऱ्या दरात सर्वसामान्यांना घरे उपलब्ध करून द्यावीत. मुंबईतील बी.डी.डी. चाळींच्या धर्तीवर बांधकामाचा दर्जा उत्तम ठेवून प्रकल्प वेळेत पूर्ण करावेत, असे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी यावेळी दिले.

**गणेशमूर्तीदान**

पुणे शहरात पर्यावरणपूरक गणेशोत्सवाचा संदेश देत महापालिकेला गणेशमूर्ती दान करणाऱ्या भाविकांसाठी मोफत सेंद्रिय खताचं वाटप करण्यात आलं. उरुळी देवाची इथं कचऱ्यावर प्रक्रिया करण्याचा प्रकल्प महापालिकेतर्फे राबवण्यात येत असून, त्यातून दर्जेदार सेंद्रिय खत तयार केलं जातं. पर्यावरण संवर्धनाचा भाग म्हणून भूमिग्रीन एनर्जी एनवायरो केअर कंपनी दरवर्षी या उपक्रमात सहभागी होत असते. यंदा १ लाख ७२ हजार गणेशमूर्ती दान करण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर कंपनीतर्फे शहरातील अनेक विसर्जन घाटांवर गणेशमूर्तीदान करणाऱ्या भाविकांना भेट म्हणून सुमारे १५ हजार किलो सेंद्रिय खत वाटण्यात आले.

**Pcmcगणेशोत्सव**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने गणेशोत्सव काळात राबविण्यात आलेल्या निर्माल्य संकलन मोहिमेला नागरिकांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे. या उपक्रमांतर्गत २५६ टन निर्माल्याचे संकलन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे नदी, नाले आणि तलावात निर्माल्य टाकण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणावर घटले असून जलप्रदूषण नियंत्रणात ठेवण्यास मदत झाली आहे. या उपक्रमांतर्गत संकलित झालेल्या निर्माल्याचा पर्यावरणपूरक पद्धतीने पुनर्वापर करून त्याद्वारे खत निर्मिती करण्यात येणार आहे.

गणेशोत्सवमंडप

पुण्यातील गणेशोत्सव मंडळांनी तातडीने मंडप आणि रथ रस्त्यातून बाजूला करावेत, असं आवाहन महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी केले आहे. गणेश विसर्जन मिरवणुकीला वेळ लागल्यानंतर शहरात मोठ्याप्रमाणावर वाहतूक कोंडी झाली होती. शहरातील प्रमुख रस्त्यांवरील मांडव आणि विसर्जन मिरवणुकीतील रथांनी रस्ते व्यापल्याने या वाहतूक कोंडीत भरच पडत होती. या पार्श्वभूमीवर आयुक्तांनी हे आवाहन केलं आहे.

**स्मारक**

महात्मा जोतिबा फुले आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांनी पुण्यात भिडेवाडा येथे पहिली मुलींची शाळा सुरू केली आहे. या ठिकाणी आता क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांचे राष्ट्रीय स्मारक उभारण्यात येत आहे. येत्या जानेवारी महिन्यापर्यंत हे काम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती पुणे महापालिकेनं दिली आहे. गणेशोत्सवाच्या काळात या स्मारकाचं काम बंद ठेवण्यात आलं होतं ते आता पुन्हा वेगाने सुरु झालं असल्याचं महापालिकेनं म्हटलं आहे.

**विसर्जनएआय**

पुण्यात यंदाच्या गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान गर्दीवर लक्ष ठेवण्यासाठी पोलिसांनी कृत्रिम बुद्धिमत्ता यंत्रणेसह सीसीटीव्ही प्रणाली आणि रिअल-टाइम ॲनालिटिक्सचा उपयोग केला होता. या तंत्रज्ञानावर आधारित उपक्रमामुळे कोणतीही अनुचित घटना घडली नाही. शनिवारी हजारो भाविक विसर्जन मार्गांवर जमा झाले होते, परंतु शहरातील प्रमुख मिरवणूक मार्ग एआय आणि फेशियल रिकग्निशन असलेल्या कॅमेऱ्यांच्या देखरेखीखाली होते. हे सर्व कॅमेरे शिवजीनगरमधील नियंत्रण केंद्राशी जोडलेले होते. त्याचवेळी, फरासखाना पोलीस ठाण्यातील एका वॉर रूममधून मैदानावर काम करणाऱ्या पोलीस पथकांशी समन्वय साधला जात होता. या कॅमेऱ्याच्या माध्यमातून सुमारे 250 व्यक्तींना संशयित म्हणून चिन्हांकित करण्यात आले आणि गुन्हे शाखा अधिकाऱ्यांनी त्यांची पडताळणी केली. यासाठी आठ लाख चेहऱ्याचं स्कॅनिंग करण्यात आलं, अशी माहिती सहाय्यक पोलीस आयुक्त विवेक पवार यांनी दिली.

**<u>प्रभागरचना-हरकती</u>**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या प्रारूप प्रभाग रचनेवर नागरिकांनी दाखल केलेल्या हरकती आणि सूचनांवर उद्या सुनावणी होणार आहे. सर्व प्रभागातून नागरिकांच्या 318 हरकती आल्या आहेत. ज्या नागरिकांनी हरकती नोंदवल्या आहेत, त्या नागरिकांना प्रभागानुसार वेळ देण्यात आली असून संबंधितांनी ओळखपत्रासह प्रत्यक्ष हजर राहण्याचं आवाहन महापालिका प्रशासनाने केलं आहे.

**<u>डेंग्यू-चिकनगुनिया</u>**

वातावरणातील वाढलेली आर्द्रता आणि तापमानातील चढ-उतार यामुळे डासांची उत्पत्ती वाढली असून राज्यभरात डेंग्यू-चिकनगुनिया सारख्या कीटकजन्य आजारांचा प्रादुर्भाव दिसून येत आहे. आज अखेर राज्यात डेंग्यूचे 5 हजार 962 रुग्ण आढळले असून, त्यापैकी पुणे जिल्ह्यात सर्वाधिक 265 रुग्ण आहेत. राज्यात चिकुनगुनियाचेही 1 हजार 945 रुग्ण आढळले आहेत. त्यात पुणे जिल्ह्यातील 176 रुग्ण असल्याचं पुणे महापालिकेचे सहाय्यक आरोग्य प्रमुख डॉ. राजेश दिघे यांनी सांगितलं.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३१ तर किमान तापमान १८ पूर्णांक ५ दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल, तसंच दुपारनंतर हलक्या पावसाचाही अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत, उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**